# यवतमाळ येथील औद्योगिक प्रदर्शनीत महानिर्मितीचे दालन






विदर्भातील लघुउद्योजकांना व्यापारवाढीसाठी सुवर्णसंधी उपलब्ध व्हावी या उद्येशाने विदर्भ चेंबर ऑफ इंडस्ट्रीज, यवतमाळ, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, मुंबई व कापुस उत्पादक पणन महासंघ यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक २१/२२ फेब्रुवारी २००९ रोजी स्व.दादासाहेब कोल्हे सभागृह, दारव्हा रोड, यवतमाळ येथे व्हेंडर डेव्हलपमेंट, औद्योगिक प्रदर्शनी व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनीचा उद्घाटन समारंभ दिनांक २१.०२.२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता अध्यक्ष श्री.वासुदेवराव गोरडे, लोकपाल, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई व प्रमुख पाहुणे श्री.व्ही.पी. सिंग, मुख्य महाव्यवस्थापक, चंद्रपुर महा.औ.वि. केंद्र उपस्थितीत पार पडला.

या प्रदर्शनात देशातल्या वीज निर्मिती क्षेत्रातील नामांकित कंपनी म्हणून महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी महानिर्मितीचे दालन विशेष आकर्षण ठरले. या प्रदर्शनात कोराडी, चंद्रपूर व खापरखेडा वीज निर्मिती केंद्र यांनी भाग घेतला होता.

वीजनिर्मिती क्षेत्रात सातत्याने लागणाऱ्या संयंत्राच्या सुटया भागांचे नमुने सॅम्पल्स तथा छायाचित्राचे महानिर्मिती दालनात प्रदर्शित करण्यात आले होते. तसेच आगामी विस्तारीत वीज प्रकल्पांची माहिती या दोन दिवसांच्या प्रदर्शनामध्ये लघु उद्योजकांना देण्यात आली. लघु उद्योजकांना संयत्राच्या सुटया भागांचा पुरवठा करण्याकरिता ही एक पर्वणीच ठरली.

दिनांक २२ फेब्रुवारी ला आयोजित, ''सुटे भाग खरेदी करणारे प्रकल्प व त्याचे उत्पादन करू इच्छिणारे लघु उद्योजक'' या चर्चा सत्रामध्ये श्री.किशोर सगणे, सहाय्यक अभियंता, कोराडी औ.वि. केंद्र, कोराडी यांनी वीज निर्मिती या राष्ट्रीय कार्यात कोराडी, खापरखेडा आणि चंद्रपुर वीज केंद्राना आवश्यक असणाऱ्या यंत्र सामुग्री व स्वयंत्राच्या सुटया भागांचा पुरवठा लघु उद्योजकांनी करावा, असे आवाहन केले.

वीज प्रकल्पांना लागणारी यंत्र सामुग्री व सुटे भाग बाहेरून फार मोठया प्रमाणात विकत घेतले जातात. विदर्भातील लघु उद्योजक या वीज प्रकल्पांना लागणारे सुटे भाग बनवु शकतात व त्या संबंधिची पूर्ण माहिती कोराडी, चंद्रपूर व खापरखेडा वीज केंद्रातर्फे पुरविण्यांत येईल, असे सांगण्यात आले. चर्चासत्रामध्ये वीज केंद्रात लागणाऱ्या सुटया भागांचे वितरण, व त्याची खरेदी पद्धत व पुरवठा करण्या करिता आवश्यक नोंदणी प्रणाली या विषयाची माहिती संबधितांना देण्यात आली तसेच लघु उद्योजकांच्या सर्व शंकांचे निराकरण करण्यात आले.

औद्योगिक प्रदर्शनाच्या यशस्वीते करिता श्री.लक्ष्मीकांत कडाव, मुख्य महाव्यवस्थापक, श्री.बी.झेड. शिवणकर, अधीक्षक अभियंता (समन्वय), कोराडी औ.वि. केंद्र, कोराडी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच कंपनीच्या दालनाला भेट देणारे प्रमुख पाहुणे व लघुउद्योजक यांना माहिती देण्यासाठी श्री.अविनाश प्रभुणे, कनिष्ठ अभियंता व श्री भोलारे यांनी सहकार्य केले.







(पान २० वरून)

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी-श्री.सुरेश नारखेडे-कार्यकारी संचालक (प्रकल्प-२), कोराडी तर विशेष उपस्थिती मध्ये श्री.भालचंद्र गोखले-मुख्य महाव्यवस्थापक (प्रकल्प) खापरखेडा, श्री.अशोककुमार अग्रवाल-महव्यवस्थापक (स्थापत्य), खापरेखडा, श्री.विजय खटारे-महाव्यवस्थापक (प्रकल्प), खापरखेडा, श्री.सुरेश चिंचाळकर-महाव्यवस्थापक (बांधकाम), कोराडी, श्री.जी.एम. उईके-महाव्यवस्थापक (वित्त आणि लेखा), तसेच सौ. रानडे आदि प्रामुख्याने उपस्थित होते. निरोप समारंभाचे सूत्रसंचालन श्री.जैन यांनी तर आभार श्री.विजय घोरमारे यांनी मानले.

निरोप समारंभाला अधीक्षक अभियंता सर्वश्री.विनोद वैद्य, सुधीर वाटवे, एम.डी. गोडवे सुरेश बैरागी-आस्थापना अधिकारी, कार्यकारी अभियंता सर्वश्री.के.एल. देशमाने, एच.जे.शुक्ला, रोकडे, नातू, पी.आर. शिंगाडे, निंबूळकर, राऊत, कारगांवकर, देशमुख, उप मुख्य लेखाधिकारी-शंकर डोंगरे तसेच प्रकल्प तथा स्थापत्य विभागातील अधिकारी, कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.